# शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई विभाग, मुंबई.

## इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७

# जाहीर प्रकटन

रीट पिटीशन क्र.१२७/२०१४ नुसार मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार मुंबई महानगरक्षेत्रातील इ. ११ वीचे प्रवेश फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावेत असे निर्देश दिलेले आहेत. **त्यामुळे कोणत्याही परीस्थितीत ऑफलाईन पध्दतीने प्रवेश होणार नाहीत हे पुन्हा ठळकपणे या प्रकटनाव्दारे जाहीर करण्यात येत आहे.** २,२२,६२२ विद्यार्थ्यांपैकी केवळ दोन विद्यार्थ्यांना चौथ्या फेरीअखेर अलॉटमेंट करता आले नाही. तसेच १,१३,१६१ विद्यार्थ्यांना प्रथम व व्दितीय पसंतीक्रम असलेले कनिष्ठ महाविद्यालय अलॉट करण्यात आलेले आहे व १,५३,३२६ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला आहे. सुमारे ७०,००० विद्यार्थ्यांना अलॉटमेंट देवूनही प्रवेश घेतला नसल्याचे निदर्शनास येते. कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही असे आश्वासन मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी विधिमंडळास दिले आहे. याकरीता उर्वरीत विद्यार्थ्यांसाठी विशेष ऑनलाईन फेरीचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

### विशेष ऑनलाईन प्रवेश फेरीची कार्यपध्दती व वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | दिनांक |
|---|---|---|
| १. | इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्णतः ऑनलाईन होणार असल्याबाबत व पुढील प्रवेश प्रक्रियेबाबत वृत्तपत्रात प्रकटन देणे | २२ जुलै २०१६ |
| २. | अलॉट करूनही प्रवेश न घेतलेले (Not Reported) विद्यार्थ्यांना अलॉट झालेल्या महाविद्यालयात जागा रिक्त असल्यास सदर महाविद्यालयास संपर्क साधणेबाबत विद्यार्थ्यांस एस एम एस व्दारे पाठविणे तसेच त्याच्या मूळ लॉगीनमध्ये याबाबत संदेश पाठविणे. | २५ जुलै २०१६ |
| ३. | अलॉट झालेल्या महाविद्यालयात विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे अपलोडिंग करणे | २८ जुलै २०१६ |
| ४. | ज्या विद्यार्थ्याने अर्ज भरलेले नाहीत, अर्धवट अर्ज भरले आहेत तसेच ॲलोकेशन न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पाचव्या ऑनलाईन फेरीचे आयोजन करणे | |

| | | |
|---|---|---|
| | अ) प्रवेश अर्ज सादर करणे | ३० जुलै २०१६ ते ०२ ऑगस्ट २०१६ |
| | ब) गुणवत्ता यादी जाहीर करणे | ०४ ऑगस्ट २०१६ |
| | क) संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे | ५, ६ ऑगस्ट २०१६ |
| ५. | ज्या विद्यार्थ्यांना दूरचे महाविद्यालय मिळालेले आहे, विषय चुकीचा निवडला आहे, शाखा बदल करावयाची आहे, प्राधान्यक्रम चुकला आहे, जुलै २०१६ मध्ये झालेल्या इ.१० वी च्या पुरवणी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच ए.टी.के.टी. प्राप्त झालेले विद्यार्थी तसेच उर्वरीत विद्यार्थी यांच्यासाठी विशेष ऑनलाईन फेरीचे आयोजन करणे (याकरीता नव्याने नोंदणी व नव्याने फी भरणे आवश्यक) | |
| | अ) पहिली विशेष फेरी | ०९ ते १३ ऑगस्ट २०१६ |
| | ब) दुसरी विशेष फेरी | १८ ते २३ ऑगस्ट २०१६ |
| | क) तिसरी विशेष फेरी | २५ ते ३० ऑगस्ट २०१६ |

(बी.बी.चव्हाण)
शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग, मुंबई.